मुंबई । सोमवार
२४.७.२०२३
किंमत : ₹ ५ ■ वर्ष : २६ अंक : ८५ ■ पृष्ठे : १२+४ = १६
आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ६८६२३/१९९८
www.lokmat.com
epaper.lokmat.com
लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

कुटुंबीयांना अश्रू अनावर : श्रद्धा फाउंडेशनच्या प्रयत्नाला यश

# 'तो' २१ वर्षांनंतर कुटुंबीयांना भेटला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** कर्जत परिसरामध्ये २०१९ मध्ये सापडलेल्या मनोरुग्णावर श्रद्धा फाउंडेशन या सामाजिक संस्थेने यशस्वी उपचार केले आहेत. एमडी रहमान असे या तरुणाचे नाव असून, तो मूळचा बांगलादेशमधील रहिवासी आहे. २१ वर्षांनंतर त्याच्या कुटुंबीयांशी भेट घडविण्यात संस्थेला यश आले आहे. दोन दशकानंतर मुलगा सापडल्यामुळे आईवडिलांना अश्रू अनावर झाले आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. भरत वाटवाणी १९८८ पासून मनोरुग्णांवर उपचार करण्याचे काम करत आहेत. कर्जतमधील श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून मनोरुग्णांवर उपचार करून त्यांना त्यांच्या घरी पाठविण्यात येत आहे. २०१९ मध्ये कर्जतमधील रस्त्यांवर एक तरुण आढळला होता. त्याच्यावरही संस्थेने उपचार सुरू केले. उपचारानंतर त्याचे नाव एमडी रहमान असून, तो बांगलादेशमधील रहिवासी असल्याचे समजले. अहमदनगरमधील सामाजिक कार्यकर्ते गिरीश कुलकर्णी यांनी सद्भावना यात्रा काढल्यानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये बांगलादेशी शिष्टमंडळाला अहमदनगरला कार्यक्रमामध्ये आमंत्रित केले होते. यावेळी तेथे उपस्थित असलेल्या श्रद्धाच्या स्वयंसेवकांनी बांगलादेशमधील सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांशी संवाद साधून माहिती दिली. सर्वांच्या प्रयत्नाने त्याच्या कुटुंबीयांचा शोध लावण्यात यश आले.



मनोरुग्णावर उपचार करून त्याला बांगलादेश सीमेवर घेऊन गेलेले श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे पथक.

## सरकारी परवानग्या मिळवून पाठविले मायदेशी

श्रद्धाच्या पथकाने सर्व औपचारिकता पूर्ण करून सरकारी परवानग्या मिळवून रहमानला भारत-बांगलादेश सीमेवर नेऊन त्याच्या आई-वडिलांच्या ताब्यात दिले. २१ वर्षांनंतर मुलगा भेटल्यामुळे त्याच्या आईवडील व नातेवाइकांना अश्रू आवरता आले नाहीत. कुटुंबीयांशी भेट घडवून आणण्यात संस्थेच्या डी मॅथ्यू, डॉ. रुपा टेकचंदानी, स्वराजी कोंडविलकर, नितीश शर्मा, समाधान पालकर, हरीश शेट्टी व इतरांनी महत्त्वाची भूमिका बजावली.